# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक ४८) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.०७ फेब्रुवारी २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## इंग्लंडचा धुव्वा उडवत भारतीय शिलेदारांनी अंडर-१९ वर्ल्डकपची ट्रॉफी जिंकली

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- मुंबईकर आयुष म्हात्रेच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेत इतिहास घडवला आहे. झिम्बाब्वेतील हरारे स्पोर्ट्स क्लबच्या मैदानावर भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये अंडर-१९ वर्ल्डकप स्पर्धेतील अंतिम सामन्याचा थरार रंगला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना वैभव सूर्यवंशीने १७५ धावांची वादळी खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने पहिल्या डावात ४११ धावांचा डोंगर उभारला. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या इंग्लंडच्या फलंदाजांनी पूर्ण जोर लावला. पण भारतीय संघाने हा सामना १०० धावांनी आपल्या नावावर करून सहाव्यांदा जेतेपदाला गवसणी घातली आहे. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय सुरूवातीला फसला. कारण गेल्या सामन्यातील शतकवीर आरोन जॉर्ज या महत्वाच्या सामन्यात अवघ्या ९ धावा करून माघारी परतला. पण त्यानंतर वैभव सूर्यवंशी आणि कर्णधार आयुष म्हात्रेने मिळून भारतीय संघाचा डाव सांभाळला. दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी मिळून १४२ धावांची भागीदारी केली. या भागीदारीदरम्यान आयुष म्हात्रेने ५१ चेंडूत ५३ धावांची खेळी केली. तर वैभव सूर्यवंशीने अवघ्या ८० चेंडूत १५ चौकार आणि १५ षटकारांच्या साहाय्याने १७५ धावांची खेळी केली. या जोडीने भारतीय संघाला मजबूत स्थितीत पोहोचवलं. वैभव सूर्यवंशीचं दुहेरी शतक अवघ्या २५ धावांनी हुकलं. त्यानंतर वेदांत त्रिवेदी ३२ आणि विहान मल्होत्राने ३० धावांची खेळी केली. शेवटी अभिज्ञान कुंडूने ४० आणि कनिष्क चौहानने नाबाद ३७ धावांची खेळी करून संघाची धावसंख्या ९ गडी बाद ४११ धावांवर पोहोचवली.

## मिनीमंत्रालय १२ झेडपी, १२५ पंचायत समित्यांसाठी आज मतदान

### २११९३ जागा, ७४३८ उमेदवार; २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ मतदार करणार फैसला

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी उद्या (ता. ७) मतदान होत असून जिल्हा परिषदेच्या ७३१; तर आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी ही निवडणूक होत आहे. एकूण ७ हजार ४३८ इतके उमेदवार निवडणूक रिंगणात असून सर्व मिळून एकूण २ कोटी ८ लाख २० हजार ७०२ इतकी मतदार संख्या आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी पुरेशा पोलिस बंदोबस्ताचीदेखील व्यवस्था करण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव आणि लातूर या १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा १३ जानेवारी २०२६ रोजी केली होती. त्यानुसार ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार होते; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यानंतर मतदानाच्या तारखेत बदल करण्यात आला. त्यानुसार आता उद्या (ता. ७) सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल. त्यानंतर आचारसंहिता संपुष्टात येईल.

सर्व बारा जिल्हा परिषदांच्या एकूण ७३१ जागा असून, त्यातील ३६९ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी ८३, अनुसूचित जमातींसाठी २५ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी १९१ जागा आरक्षित आहेत. जिल्हा परिषदांच्या या सर्व जागांसाठी एकूण २ हजार ६२४ उमेदवार निवडणूक लढवित आहेत.

सर्व १२५ पंचायत समित्या मिळून एकूण १ हजार ४६२ जागा असून, त्यातील ७३१ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातींसाठी १६६, अनुसूचित जमातींसाठी ३८ आणि नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी ३४२ जागा आरक्षित आहेत. पंचायत समित्यांच्या या सर्व जागांसाठी एकूण ४ हजार ८१४ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

निवडणूक होत असलेल्या जिल्हा परिषदांच्या व त्यांतर्गतच्या पंचायत समित्यांच्या एकूण मतदारांमध्ये १ कोटी ६ लाख ३३ हजार २६९ पुरुष, १ कोटी १ लाख ८६ हजार ९६५ महिला; तर ४६८ इतर मतदारांचा समावेश आहे. त्यांच्यासाठी एकूण २५ हजार ४७१ मतदान केंद्राची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेसाठी सुमारे १ लाख २८ हजार इतक्या मनुष्यबळाची व्यवस्था केली आहे. त्यात सुमारे १२५ निवडणूक निर्णय अधिकारी आणि १२५ सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठीच्या २५ हजार ४७१ मतदान केंद्रांची संख्या लक्षात घेऊन पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात ५१ हजार ५३७ कंट्रोल युनिट आणि १ लाख १० हजार ३२९ बॅलेट युनिटचा समावेश आहे. त्यासाठी सर्व सबंधित अधिकारी कर्मचाऱ्यांना वेळोवेळी प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे.

## लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी सुरुच

### आज १० मिनिटे कामकाज; ९ फेब्रुवारीपर्यंत कामकाज स्थगित

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- लोकसभेत गोंधळ आणि घोषणाबाजी आज सुद्धा राहिली. पहिल्यांदा कामकाज फक्त तीन मिनिटे चालले आणि दुसऱ्यांदा सात मिनिटे चालले. त्यानंतर, लोकसभा ९ फेब्रुवारीपर्यंत तहकूब करण्यात आली. दरम्यान, केंद्रीय मंत्री रवनीत बिट्टू यांनी राहुल गांधींवर टीका करताना म्हटले की, ''काल सर्वांनी त्यांना अबोध बालक म्हटले. आज पंतप्रधानांची शाळा होती, जिथे मुलांना यशस्वी होण्यास शिकवले जाते. जर राहुल गांधीही पंतप्रधानांच्या शाळेत गेले असते तर ते आयुष्यात यशस्वी झाले असते.'' गुरुवारी लोकसभा आणि राज्यसभेत गोंधळाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्ताव मंजूर करण्यात आला. २००४ नंतर पहिल्यांदाच पंतप्रधानांच्या भाषणाशिवाय लोकसभेत हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. राज्यसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या भाषणानंतर हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

जेव्हा सभापती ओम बिर्ला यांनी सुरक्षेच्या कारणास्तव पंतप्रधान मोदींना लोकसभेत भाषण न करण्यास सांगितले तेव्हा काँग्रेस खासदार माणिकम टागोर म्हणाले, ''आम्ही जगाचे नेते आहोत.''

आमचे पंतप्रधान ५६ इंचाच्या छातीचे नेते आहेत आणि ते स्वतःच्या घरातही पाकिस्तानी लोकांचा सामना करू शकतात. ते असे नाटक का करत आहेत आणि असे खोटेपणा का पसरवत आहेत? लोकसभा हे ते ठिकाण आहे जिथून ते निवडून आले. ते त्यातील एक सदस्य आहेत. ते खासदारांवर आरोप करत आहेत.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, ''आम्ही शीख समुदायाचा आदर करतो, आमच्या सरकारमध्ये मनमोहन सिंग अर्थमंत्री होते. भाजप शीख, दलित आणि आदिवासींचा आदर करत नाही; गेल्या १० वर्षांत त्यांनी काँग्रेसला शिव्या देण्याशिवाय काहीही केलं नाही.'' राज्यसभेत पंतप्रधानांच्या भाषणाला उत्तर देताना खरगे यांचे हे विधान आले आहे, जेव्हा पंतप्रधान म्हणाले होते की काँग्रेस शीखांबद्दल द्वेषाने भरलेली आहे.

समाजवादी पक्षाचे खासदार राजीव राय म्हणाले, ''जर पंतप्रधानांनी याला मान्यता दिली असेल किंवा ते योग्य मानले असेल, तर सभागृहात बसून आपल्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, ज्या आता या जगात नाहीत, त्यांच्या चारित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असेल आणि नेहरूंना देशद्रोही म्हटले असेल, तर ते या देशासाठी अत्यंत दुर्दैवी आहे.''

## दिल्लीतील रस्त्यावरील खड्ड्यात पडून तरुणाचा मृत्यू; राहुल गांधींचा सरकारवर हल्ला

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असताना राजधानी दिल्लीत एक मन सुन्न करणारी घटना घडली. २५ वर्षाचा तरुण रस्त्यात खोदलेल्या खड्ड्यात पडला. रात्रभर तडफडून त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संताप व्यक्त केला.

'हा अपघात नाही, तर हत्या आहे. आणि उत्तरदायित्व झटकणारी, त्यापासून पळणारी सत्ता त्याची आरोपी आहे', असे म्हणत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारावर हल्ला चढवला. २५ वर्षीय कमल ध्यानी याचा दिल्लीतील जनकपुरी पश्चिम भागात रस्त्यावरील खड्ड्यात पडून मृत्यू झाला. रात्री १२ वाजेपासून बेपत्ता असलेल्या कमलचा सकाळी मृतदेहच मिळाला. या घटनेतील संतापजनक बाब म्हणजे पोलिसांचा मस्तवालपणा. कुटुंबीयांकडून शोध घेण्याची विनंती केली जात असतानाही पोलीस म्हणाले की, २५ तासांनंतर तक्रार नोंदवली जाईल.

दिल्लीतील जनकपुरी पश्चिममध्ये घडलेल्या या घटनेने दिल्ली हादरली आणि प्रशासकीय आणि पोलीस व्यवस्थेवर सडकून टीका होऊ लागली आहे. बँक कॉल सेंटरमध्ये काम करणारा कमल ध्यान हा २५ वर्षीय तरुण (पान ४ वर)

## पाकिस्तानात शिया मशिदीत नमाज दरम्यान आत्मघाती हल्ला

### ६९ ठार, १६९ गंभीर जखमी; राजधानी इस्लामाबादमध्ये आणीबाणी जाहीर

इस्लामाबाद दि.६ (वृत्तसंस्था)- पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमधील एका शिया मशिदीत (इमांबरा) आज नमाज पढत असताना आत्मघातकी हल्ला झाला. पाकिस्तानी वृत्तपत्र डॉनच्या वृत्तानुसार, या हल्ल्यात ६९ जणांचा मृत्यू झाला आणि १६९ जण जखमी झाले. पोलीस आणि बचाव पथक घटनास्थळी पोहोचले. त्यांनी बचाव कार्य सुरू केले. यावेळी रुग्णालयांना सतर्क करण्यात आले असून जखमींना उपचारासाठी तातडीने हलवण्यात आले. स्फोटानंतर, इस्लामाबाद पोलिस प्रमुखांनी शहरात आणीबाणी जाहीर केली. मृतांची संख्या वाढू शकते अशी अधिकाऱ्यांना भीती आहे.



पाकिस्तानचे राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांबद्दल शोक व्यक्त केला. ते म्हणाले की, निष्पाप लोकांना लक्ष्य करणे मानवतेच्या विरोधात आहे. जखमींच्या जलद पुनर्प्राप्तीसाठी झरदारी यांनी प्रार्थना केली आणि अधिकाऱ्यांना त्यांना सर्वोत्तम वैद्यकीय सेवा देण्याचे निर्देश दिले.

पाकिस्तानी सरकारचे मंत्री डॉ. तारिक फजल चौधरी यांनी सोशल मीडियावर लिहिले की, ''मी इस्लामाबादमधील स्फोटाचा तीव्र निषेध करतो. जीवितहानीमुळे मला दुःख झाले आहे.'' अशा दहशतवादी घटनांमुळे देश आणि तेथील लोकांचे मनोबल खचू शकत नाही. आपण सर्वांनी शांतता, सहिष्णुता आणि स्थिरतेसाठी (पान ४ वर)

## 'अजित पवारांच्या विमानात बॉम्ब होता का?; बजरंग सोनवणेंनी व्यक्त केली शंका

नवी दिल्ली दि.६ (वृत्तसंस्था)- अजित पवार यांचं बारामतीमध्ये विमान अपघातात निधन झालं. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण देशात हळहळ व्यक्त करण्यात आली. मात्र, या विमान दुर्घटनेबाबत आता अनेकांनी तर्कवितर्क लावण्यास सुरुवात केली आहे. सध्या नागरी विमान वाहतूक संचालनालयाकडून या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे.

दरम्यान, अजित पवारांच्या विमान दुर्घटनेबाबत आता राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे खासदार बजरंग सोनवणे यांनी एक वेगळीच शंका व्यक्त केली आहे. 'अजित पवार यांच्या विमानात बॉम्ब होता का?', असा सवाल बजरंग सोनवणे यांनी विचारला आहे. 'अजित पवार यांचं विमान जमिनीला टच होण्याआधीच विमानाचा ब्लास्ट झाला', असं वक्तव्य बजरंग सोनवणे यांनी केलं आहे.

''सीसीटीव्ही फुटेजमध्ये काय दिसतंय तुम्ही पाहा. काय दिसतंय? विमान खाली जमीनीला टच होऊन मग क्रॅश झालं नाही. मला जेवढं कळतंय, विमान खाली येताना तिरकं झालं, पण जमीनीला टच होण्याआधीच विमानाचा ब्लास्ट झाला. कारण त्या ब्लास्टमध्ये देखील विमानाचा पुढचा जो भाग आहे तेथील लोक बाहेर फेकले गेले आणि त्यानंतर विमान जमीनीला टच होऊन स्फोट झाला, म्हणजे ही घटना काय असू शकते? याबाबत संशय नाही का? का त्यात बॉम्ब होता? का विमानाच्या इंजिनाचा ब्लास्ट झाला?'', अशी शंका उपस्थित करत बजरंग सोनवणे यांनी वेगवेगळे सवाल उपस्थित केले आहेत.

## काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल, पंतप्रधान शाहबाज शरीफ पुन्हा बरळले

इस्लामाबाद दि.६ (वृत्तसंस्था)- पहलगाम येथील दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर भारताने राबविलेल्या ऑपरेशन सिंदूरमुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध अधिक ताणले गेलेत. ऑपरेशन सिंदूर अपयशी ठरल्याचा दावा करणाऱ्या पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केलं आहे. ''काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल,'' असे विधान शरीफ यांनी केले आहे. शरीफ गुरुवारी पाकव्याप्त काश्मीरमधील सभेला संबोधित करताना बोलत होते.

काश्मीर एकता दिनानिमित्त देशभरात रॅली आणि निदर्शने आयोजित केली जात असताना शरीफ यांचे विधान चर्चेत आले आहे. मुझफ्फराबादमधील विधानभवनासमोर उपस्थितांना संबोधित करताना शाहबाज यांनी हे वक्तव्य केले आहे. काश्मीरबाबत इस्लामाबादच्या भूमिकेचा उल्लेखही करताना पाकिस्तान काश्मिरी लोकांच्या समर्थनात उभा असल्याचा पुनरुच्चारही केला.

''काश्मिरी लोकांच्या मताचा आदर करणे आणि संयुक्त राष्ट्राचा ठराव मान्य करणे हा जम्मू काश्मीरच्या मुद्यावर तोडगा आहे'', असे शरीफ यावेळी म्हणाले. ''पाकिस्तानची जनता आणि सरकार यांच्या वतीने काश्मिरी लोकांसोबत ठामपणे उभं राहण्यासाठी आणि समर्थन दर्शविण्यासाठी मी आलो आहे'', असेही शरीफ यांनी सांगितले.

शरीफ यांनी यावेळी वादग्रस्त विधान करताना दोन्ही देशात तणाव निर्माण होईल असे वक्तव्य केले. ''काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल'', असे शरीफ सभेला संबोधित करताना म्हणाले.

(पान ४ वर)

## केंद्र सरकारविरुद्ध कुणाल कामरा उच्च न्यायालयात, कायद्यातील दुरुस्ती ही मनमानी असल्याचा याचिकेत दावा

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- हस्यकलाकार कुणाल कामरा याने पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. तसेच, 'सहयोग पोर्टल' आणि माहिती तंत्रज्ञान (मध्यस्थ मार्गदर्शक तत्त्वे आणि डिजिटल मीडिया आचारसंहिता) नियम, २०२१ च्या नियम ३ (१) (डी) मधील २०२५ च्या दुरुस्तीच्या घटनात्मक वैधतेला आव्हान दिले आहे.

समाजमाध्यम मध्यस्थांवर पोस्ट केलेली सामग्री काढून टाकण्याशी संबंधित या तरतुदी आहेत. यापूर्वी, 'एक्स कॉर्प'ने या तरतुदींना कर्नाटक उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. कर्नाटक उच्च न्यायालयाने त्यावर निर्णय देताना, सहयोग पोर्टल हे सेन्सॉरशिपचे नाही, तर ते समाजमाध्यम माध्यम आणि सरकारी संस्था यांच्यात सहकार्य सुनिश्चित करणारे साधन आहे, असे म्हटले होते. कामरा याने त्याच्या याचिकेत, ही आक्षेपार्ह यंत्रणा असून ती समांतर सामग्री-ब्लॉकिंग चौकट तयार करत असल्याचे म्हटले आहे. तसेच, त्यामुळे माहिती तंत्रज्ञान कायदा, २००० च्या कलम ६९ ए अंतर्गत अनिवार्य असलेल्या प्रक्रियात्मक सुरक्षा उपायांना बगल देत (पान ४ वर)

## अजित पवारांच्या मृत्यूचे राजकारण बंद झाले पाहिजे-फडणवीस

नागपूर दि.६ (प्रतिनिधी)- अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. या संदर्भात होत असणारा वाद हा अतिशय निरर्थक आणि चुकीचा आहे. प्रत्येक व्यक्ती स्वतःच राजकारण यात कसं पाहता येईल, हा प्रयत्न करत असल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. हे अतिशय चुकीचे आहे. शेवटी राज्याचे उपमुख्यमंत्री, राज्याचे अतिशय प्रसिद्ध व्यक्तिमत्व असणारे एक मोठे नेते, अजित दादा पवार हे दुर्दैवाने आपल्यातून निघून गेले आहेत. त्यानंतर प्रत्येक व्यक्ती त्याच्या माध्यमातून राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहे. हे अतिशय चुकीचे आहे. अशा प्रकारचे खालचे राजकारण बंद झालं पाहिजे, असे ठाम मत देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले आहे.

अजित पवार यांच्या विमान अपघातातील निधनानंतर सुरू झालेल्या राजकीय वादांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या दुर्दैवी घटनेतून काहीजण राजकारण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ते म्हणाले. राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जनतेत लोकप्रिय असलेले नेते अचानक आपल्यातून निघून गेल्यानंतर अशा प्रकारचे आरोप-प्रत्यारोप करणे अत्यंत चुकीचे असल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. या घटनेतून राजकारण करण्याचा प्रयत्न दुर्दैवी आहे. हे खालच्या पातळीचे राजकारण तात्काळ थांबले पाहिजे, असा कडक इशाराही त्यांनी दिला.

मुंबईहून बारामतीकडे प्रचारसभेसाठी रवाना झाले असताना अजित पवार यांच्या विमानाचा धावपट्टीजवळ भीषण अपघात झाला होता. या अपघातात अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला. अपघातानंतर काही व्हिडिओ समोर आले, ज्यामध्ये विमान कोसळल्यानंतर मोठे स्फोट झाल्याचे (पान ४ वर)

## लाडक्या बहिणींना ई-केवायसी दुरुस्तीसाठी ३१ मार्चपर्यंत पोर्टल सुरु

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अनेक लाभार्थी महिलांकडून पैसे मिळाले नसल्यानं राज्यभरात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात आले होते. ई- केवायसी संदर्भातील पर्याय निवडताना काही चुकीचे पर्याय निवडले गेल्यानं महिलांचे पैसे थकले असल्याची चर्चा होती. अखेर महिला व बाल विकास विभागानं ई-केवायसीचं पोर्टल पुन्हा सुरु केलं आहे. आजपासून या पोर्टलवरुन ई-केवायसी दुरुस्ती ३१ मार्चपर्यंत करता येणार आहे.

यापूर्वी मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांनी - माध्यमातून ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आधार प्रमाणीकरण करुन - प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र ती प्रक्रिया पूर्ण करताना लाभार्थी महिलांकडून ''लाभार्थ्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नसावा किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहे किंवा कसे'' याबाबत पर्याय निवडताना (पान ४ वर)

## राज्यातील ८ शहरांना मिळाले नवे महापौर; नागपूर, संभाजीनगरसह ६ शहरांत भाजपचा महापौर

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- राज्यातील ८ महापालिकांमध्ये आज महापौर व उपमहापौरपदाची निवडणूक पार पडली. यात नागपूर व छत्रपती संभाजीनगरसह ६ शहरांत सत्ताधारी भाजप, तर एका महापालिकेत सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचा महापौर खुर्चीत बसला आहे. उर्वरित एका ठिकाणी सध्या महापौर निवडीची प्रक्रिया सुरू आहे.

राज्यातील जळगाव, धुळे, कोल्हापूर, पिंपरी - चिंचवड, नागपूर, अमरावती, सोलापूर व नाशिक या ८ बड्या महापालिकांत आज महापौर निवडीची प्रक्रिया पार पडली. यात सोलापूर, जळगाव व अहिल्यानगर येथील चुरशीच्या वाटणाऱ्या निवडणुका ऐनवेळी बिनविरोध झाल्या. तर नागपूर व धुळ्यात भाजपने मोठ्या मताधिक्क्याने विजय मिळवला. सोलापूर महापालिकेच्या महापौरपदी भाजपच्या विनायक कोंड्याल यांची बिनविरोध निवड झाली. येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेना व एमआयएमच्या उमेदवारांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे कोंड्याल यांचा मार्ग मोकळा झाला.

जळगाव महापालिकेत भाजपच्या दीपमाला काळे यांची महापौरपदी वर्णी लागली. तर शिवसेनेच्या शिंदे गटाचे मनोज चौधरी यांची उपमहापौरपदी बिनविरोध निवड झाली. दीपमाला काळे या जळगाव महापालिकेच्या १७ व्या महापौर ठरल्या आहेत.

दुसरीकडे, नागपूर महापालिकेत भाजपच्या नीता ठाकरे यांनी तब्बल १०४ मते मिळवत काँग्रेसच्या स्नेहल ठाकरे यांचा पराभव केला आहे. या ठिकाणी झालेल्या निवडणुकीत नीता ठाकरे यांना १०४, तर स्नेहल ठाकरे यांना ३६ मते पडली. ११ मतदारांनी येथे तटस्थ भूमिका बजावली. परिणामी, नीता ठाकरे यांचा मोठ्या मतफरकाने विजय झाला आहे. उपमहापौरपदी भाजपच्याच लीला हाथीबेड यांची नियुक्ती झाली आहे.

धुळे महापालिकेत सत्ताधारी महायुतीच्या घटकपक्षांत दुरंगी लढत दिसून आली. येथे भाजपच्या मायादेवी परदेशी यांनी ५० मते मिळवत महापौरपदी विजय मिळवला. तर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेनेच्या संयुक्त उमेदवाराला अवघ्या १३ मतांवर समाधान मानावे लागले. तिकडे नांदेड महापालिकेत पहिल्यांदाच भाजपचा महापौर विराजमान झाला आहे. नांदेड महापालिकेच्या ८१ पैकी ४५ जागा जिंकत भाजपने स्पष्ट बहुमत (पान ४ वर)

## स्वीकृत नगरसेवकपद तीनपैकी एक जागा मनसेला द्या

मुंबई दि.६ (प्रतिनिधी)- मुंबई महानगरपालिकेच्या राजकारणात स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीवरून नवा राजकीय पेच निर्माण झाला आहे. ठाकरेंच्या शिवसेनेच्या वाट्याला आलेल्या तीन स्वीकृत नगरसेवकांपैकी एक जागा मनसेला द्यावी, अशी आग्रही भूमिका मनसेच्या काही नेत्यांकडून घेतली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या मागणीमुळे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे यांच्यातील समन्वयावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, पुढील काही दिवसांत याबाबत निर्णायक घडामोडी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महापालिका निवडणुकीत जागावाटपाच्या वेळी मनसेने तुलनेने कमी जागांवर समाधान मानत ठाकरेंच्या शिवसेनेला अधिकाधिक जागा लढवण्यासाठी मोकळीक दिली होती. त्या वेळी मनसेकडून कोणताही तणाव किंवा अडथळा निर्माण करण्यात आला नव्हता. त्यामुळे आता स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीच्या वेळी तरी ठाकरेंच्या शिवसेनेने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. तीन स्वीकृत नगरसेवकांपैकी दोन ठाकरेंच्या शिवसेनेचे आणि एक मनसेचा असावा, असा प्रस्ताव चर्चेत असल्याचे सांगितले जात आहे.

# रेल्वेसाठी १४ हजार कोटींची तरतूद

मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे.

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्याला चांगलाच पावला. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे मार्गांसाठी यंदाच्या अर्थसंकल्पात १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आली. यामध्ये अहमदनगर-बीड-परळी तसेच जालना-जळगाव व नांदेड-वर्धा रेल्वे मार्गांचा समावेश आहे. मराठवाड्याच्या विकासासाठी हे तीन रेल्वे मार्ग पूर्ण होणे अत्यंत आवश्यक आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून हे रेल्वे प्रकल्प प्रलंबित असल्याने त्यावरील कामाचा खर्च दिवसेंदिवस वाढतच होता; परंतु केंद्रीय अर्थसंकल्पात या रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने आता मराठवाड्याच्या विकासाला मोठा हातभार लागणार आहे. अहमदनगर-बीड - परळी या रेल्वे मार्गासाठी ४ हजार ९५७ कोटींची तरतूद करण्यात आली. जालना-जळगाव रेल्वे मार्गासाठी ५८०४ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात आला. तसेच मराठवाडा व विदर्भाला जोडणारा नांदेड-वर्धा हा रेल्वे मार्ग गेल्या अनेक वर्षांपासून पूर्ण झालेला नाही.

या रेल्वे मार्गासाठी ३ हजार ४४५ कोटींची तरतूद या केंद्रीय अर्थसंकल्पात करण्यात आली. या तिन्ही रेल्वे मार्गांच्या प्रलंबित कामांसाठी मराठवाड्यातून गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. मराठवाड्यातील खासदार या पाठपुराव्याला कमी पडल्यामुळेच आजपर्यंत या कामाला उशीर झाला. माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी याबाबत केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला होता. मराठवाडा व कर्नाटकला जोडणारा नांदेड बिदर या रेल्वे मार्गासाठी महाराष्ट्राने आपला वाटा राज्याच्या अर्थसंकल्पात मंजूर केला आहे; परंतु कर्नाटक राज्याने त्यांच्या भागातील रेल्वे मार्ग मंजूर करण्यासाठी निधी देण्यास टाळाटाळ चालविली आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षांपासून रखडले आहे. विशेष म्हणजे नांदेडचे खासदार या कामासाठी कमी पडत आहेत. तसेच नांदेड येथे राज्यसभेवर असलेले भाजपचे दोन्हीही खासदार यासाठी अपुरे पडत असल्याचे जाणवत आहे. २०१४ पासून नरेंद्र मोदी हे भारताचे पंतप्रधान झाल्याने देशाचा समतोल विकास होत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील मराठवाड्याच्या विकासाकडे विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे. मराठवाड्यातील प्रलंबित रेल्वे प्रश्नांना पूर्णत्वास नेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच वारंवार आढावा घेत आहेत. प्रलंबित रेल्वे मार्गांच्या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या भागातील खासदारांना कामाला लावावे, अशी मागणी होत आहे. नांदेड-मनमाड मार्गावरील नांदेड-पुणे ही रेल्वे पुणेऐवजी हडपसरपर्यंत धावत आहे. नांदेडवरून दुपारी ३ वाजून पंधरा मिनिटांनी सुटणारी ही रेल्वे मनमाडमार्गे हडपसर येथे सकाळी ७.३० वाजता पोहोचत आहे. यामुळे पुणे शहर व पिंपरी-चिंचवड या भागात जाण्यासाठी प्रवाशांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे. विशेष म्हणजे २६ जानेवारीपासून हा बदल करण्यात आला. पूर्वी ही रेल्वे पुणे स्थानकापर्यंत धावत होती. त्यावेळी या रेल्वेसाठी तिकीटही मिळणे अवघड होते; परंतु आता ही रेल्वे मराठवाड्यातील प्रवाशांसाठी गैरसोयीची केल्याने केवळ ट्रॅव्हल्सवाल्यांचे फावत आहे. ज्या रेल्वे सेवेला चांगला प्रतिसाद असतो अशा रेल्वे सेवा अडगळीत टाकण्याचे प्रकार हल्ली वाढले आहे. सर्वसामान्य प्रवाशांना अशा बदलामुळे त्रास सहन करावा लागतो. याकडे लक्ष देण्यासाठी सक्षम यंत्रणा नसल्याने मराठवाड्यातून संताप व्यक्त केला जात आहे. नांदेड-पुणे या मार्गावर मराठवाड्यातील प्रवासी वंदे भारत रेल्वेसेवेची वाट पाहत आहेत. मराठवाड्यातील हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी पुण्यात स्थायिक आहेत. याचबरोबर नोकरीच्या निमित्ताने मराठवाड्यातील अनेकजण पुण्याला ये-जा करतात. विशेष म्हणजे मराठवाड्यातून पुण्याला हजारो ट्रॅव्हल्स दररोज धावत असतात. ट्रॅव्हल्स चालकांची लॉबी मराठवाड्यातून पुण्याला जाणाऱ्या रेल्वे सेवेला नेहमीच अडथळे आणतात, असा संताप मराठवाड्यातून नेहमीच व्यक्त होत असतो. मराठवाड्यातील खासदारांनी आपल्या ताकदीची एकजूट दाखवून नांदेड पुणे वंदे भारत सेवा सुरू करून दाखवावी, अशी मागणी मराठवाड्यातून गेल्या अनेक दिवसांपासून होत आहे. मराठवाडा व तेलंगणाला जोडणाऱ्या नांदेड-हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवा सुरू होणार असल्याचे तीन महिन्यांपूर्वीच काही खासदारांनी जाहीर केले होते; परंतु अद्यापपर्यंत नांदेड-हैदराबाद दरम्यान वंदे भारत रेल्वेसेवेचे कसलेही नियोजन झालेले नाही. या रेल्वेसेवेबाबत कसलाही निर्णय झालेला नसतानाच नांदेडमधील काही खासदारांनी याचे श्रेय घेऊन स्वतःची प्रसिद्धी करून घेतली. मराठवाड्यातील तीन महत्त्वाच्या प्रलंबित रेल्वे मार्गांसाठी १४ हजार कोटींची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाडा हा एक महत्त्वाचा औद्योगिक विकासाचा भाग म्हणून ओळखला जाणार आहे. ज्या भागात रेल्वे सेवा नव्हती, तिथपर्यंत रेल्वे सेवेचा विस्तार झाल्यास भविष्यात दळणवळण व वाहतुकीची सुविधा वाढणार आहे. एकीकडे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी मराठवाडा, विदर्भ तसेच राज्यातील सर्व प्रमुख रस्ते चकाचक केल्यामुळे त्याचा फायदा औद्योगिक विकासासाठी होत आहे. यापुढे रेल्वेसेवेचा विस्तार झाल्यानंतर देशाच्या कानाकोपऱ्यांतून तसेच बाहेर देशातूनही मराठवाड्यात औद्योगिक विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा केली जात आहे. यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प मराठवाड्यातील रेल्वे सेवांच्या बाबतीत अतिशय महत्त्वपूर्ण ठरला. या केंद्रीय अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद करण्यात आल्याने भविष्यात मराठवाड्याचा मोठा कायापालट दिसून येणार आहे. कुठलेही प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ठरावीक वेळेत ती कामे होणे महत्त्वाची असतात. याच दृष्टीने मराठवाड्यासाठी केलेली निधीची तरतूद योग्य वेळी केली गेली तर त्याचा फायदा नक्कीच मराठवाड्याच्या विकासासाठी होणार आहे, हे मात्र निश्चित.

# रमाबाई आंबेडकरांचे सामाजिक परिवर्तनाच्या पायाभरणीतील योगदान

**७ फेब्रुवारी** हा दिवस भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अत्यंत अर्थपूर्ण, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरतो. हा दिवस म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनसाथी, त्यागमूर्ती, संघर्षशील आणि मौनात राहूनही सामाजिक क्रांतीची मशाल पेटती ठेवणाऱ्या रमाबाई भिमराव आंबेडकर यांचा जयंती दिन होय. भारतीय समाजव्यवस्थेतील जातीय विषमता, सामाजिक अन्याय, स्त्रीदमन, आर्थिक दारिद्र्य आणि मानसिक गुलामगिरीच्या पार्श्वभूमीवर रमाबाईचे जीवन केवळ एका महापुरुषाच्या पत्नीचे जीवन नव्हते. ते जीवन एका स्वतंत्र सामाजिक योद्ध्याचे, अपार सहनशीलतेचे, निःस्वार्थ त्यागाचे आणि मौनातून घडलेल्या क्रांतीचे जिवंत प्रतीक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक, शैक्षणिक आणि राजकीय संघर्षामागे रमाबाईच्या कष्टांची, वेदनांची आणि शांत पाठबळाची भक्कम भिंत उभी होती, हे वास्तव समजून घेतल्याशिवाय आंबेडकरी चळवळीचे संपूर्ण चित्र स्पष्ट होत नाही.

रमाबाई आंबेडकर यांचा जन्म अत्यंत साध्या, उपेक्षित आणि सामाजिकदृष्ट्या वंचित परिस्थितीत झाला. त्या काळातील दलित समाजाचे जीवन म्हणजे अपमान, अस्पृश्यता, दारिद्र्य, बहिष्कार आणि सततची असुरक्षितता यांचा संगम होता. स्त्री म्हणून जन्माला येणे म्हणजे दुहेरी अन्याय सहन करणे, हीच त्या समाजाची वास्तवता होती. शिक्षण, स्वातंत्र्य, निर्णयक्षमता, आरोग्य आणि आत्मसन्मान या मूलभूत हक्कांपासून स्त्रीला वंचित ठेवणारी सामाजिक रचना रमाबाईच्या आयुष्यावरही खोलवर परिणाम करत होती. बालपणापासूनच कष्ट, काम, जबाबदाऱ्या आणि मौनातील सहनशीलता हेच त्यांच्या जीवनाचे अविभाज्य भाग बनले. लहान वयातच जीवनातील कठोर वास्तव स्वीकारावे लागल्याने त्यांचे व्यक्तिमत्त्व संयमी, सहनशील आणि आत्मसंयमी बनले.

अत्यंत लहान वयात रमाबाईचा विवाह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी झाला. हा विवाह म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील कौटुंबिक नाते नव्हते, तर तो एका व्यापक सामाजिक संघर्षाचा प्रारंभ होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आयुष्य शिक्षण, विचार, आंदोलन, संघर्ष आणि सामाजिक विरोधाने भरलेले होते. या संघर्षांचा भार रमाबाईनाही समानतेने पेलावा लागला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणासाठी, नोकरीसाठी आणि समाजसुधारणेसाठी सातत्याने व्यग्र असताना रमाबाई घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक वास्तव यांचा समतोल राखत होत्या. संसार सांभाळताना त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ध्येयांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले नाही, उलट त्या ध्येयांवर त्यांनी अढळ विश्वास ठेवला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उच्च शिक्षण भारताबाहेर सुरू असताना रमाबाईवर संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी येऊन पडली. आर्थिक टंचाई, अन्न-वस्त्राचा अभाव, आजारपण, सामाजिक उपेक्षा आणि मानसिक ताण हे त्यांचे रोजचे वास्तव होते. अनेक वेळा उपाशीपोटी दिवस काढावे लागले, साध्या वस्त्रांवर समाधान मानावे लागले. तरीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिक्षणात कोणताही अडथळा येऊ नये, हीच त्यांची ठाम भूमिका होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचनी मिळवलेले ज्ञान हे केवळ वैयक्तिक उन्नतीसाठी नसून संपूर्ण समाजाच्या मुक्तीसाठी आहे, याची रमाबाईना पूर्ण जाणीव होती. म्हणूनच त्यांनी स्वतःच्या वेदनांवर मौन धारण करून सामाजिक परिवर्तनाच्या स्वप्नाला बळ दिले. रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील सर्वांत वेदनादायी आणि हृदयद्रावक अध्याय म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन होय. मातृत्वाचा आनंद अनुभवण्याआधीच त्यांना असह्य दुःख सहन करावे लागले.



एका मागोमाग एक अपत्य गमावणे ही कोणत्याही आईसाठी अकल्पनीय वेदना असते. रमाबाईच्या आयुष्यात ही वेदना वारंवार आली. तरीही त्यांनी कधीही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यावर त्याचा परिणाम होऊ दिला नाही. स्वतःच्या दुःखाला बाजूला ठेवून समाजासाठी झटणाऱ्या पतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, हेच त्यांनी आपले जीवनधर्म मानले. रमाबाईचा हा त्याग भारतीय स्त्रीच्या सहनशीलतेचा, मानसिक बळाचा आणि निस्वार्थ प्रेमाचा सर्वोच्च नमुना आहे.

रमाबाई आंबेडकर या जरी प्रत्यक्ष सामाजिक आंदोलनांच्या मंचावर दिसत नसल्या, तरी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे, मूलभूत आणि निर्णायक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना स्थैर्य देणारे, त्यांच्या संघर्षाला मानसिक आधार देणारे आणि त्यांच्या आयुष्यातील अत्यंत कठीण काळात खंबीरपणे साथ देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे रमाबाई आंबेडकर होत्या. अस्पृश्यता निवारण, शिक्षणाचा प्रसार, सामाजिक समता, स्त्री-पुरुष समानता, धर्मांतर चळवळ आणि भारतीय संविधाननिर्मिती यांसारख्या ऐतिहासिक कार्यांसाठी बाबासाहेबांना जे मानसिक बळ आवश्यक होते, ते रमाबाईच्या निस्वार्थ त्यागातून मिळाले. रमाबाईचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे, शांत, संयमी आणि आत्मसन्मानाने भरलेले होते. प्रसिद्धी, सन्मान, मान्यता किंवा सार्वजनिक गौरवाची अपेक्षा त्यांनी कधीच ठेवली नाही. समाजाने अनेकदा त्यांच्याकडे केवळ 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्नी' म्हणून पाहिले, परंतु प्रत्यक्षात त्या एका स्वतंत्र विचारसरणीच्या, मूल्यनिष्ठ आणि आत्मसन्मान जपणाऱ्या स्त्री होत्या. अपमान, दुर्लक्ष, अवहेलना आणि कष्ट सहन करूनही त्यांनी कधी तक्रार केली नाही. त्यांचे मौन हे कमजोरीचे नव्हे, तर अंतर्गत शक्तीचे, संयमाचे आणि आत्मविश्वासाचे प्रतीक होते.

भारतीय समाजातील स्त्री-पुरुष समानतेच्या चर्चेत रमाबाई आंबेडकर यांचे जीवन अत्यंत महत्त्वाचे ठरते. त्यांनी स्त्रीवादावर भाषणे केली नाहीत, लेखन केले नाही, परंतु त्यांच्या जीवनाने स्त्रीच्या सामाजिक भूमिकेची नवी व्याख्या केली. शिक्षणापासून वंचित असूनही त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शैक्षणिक ध्येयांना त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला. त्यांच्या जीवनातून हे स्पष्ट होते की स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित नसून ती सामाजिक परिवर्तनाची शांत पण प्रभावी वाहक असते.

रमाबाई आंबेडकरांच्या जीवनातील दारिद्र्य हे केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक अन्यायाचे आणि संरचनात्मक विषमतेचे प्रतीक होते. जातीय भेदभाव, सामाजिक बहिष्कार, धार्मिक रूढी आणि स्त्री म्हणून दुय्यम स्थान या सगळ्यांचा परिणाम त्यांच्या आयुष्यावर झाला. तरीही त्यांनी परिस्थितीला दोष देत बसण्याऐवजी आशेचा मार्ग स्वीकारला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर, मूल्यांवर आणि ध्येयांवर ठेवलेला विश्वास हेच त्यांच्या जगण्याचे बळ होते. त्यांच्या जीवनातून हे अधोरेखित होते की सामाजिक परिवर्तनासाठी फक्त पुढे उभे राहणारे नेतेच नव्हे, तर मागे उभे राहून आधार देणारे व्यक्तिमत्त्वही तितकेच महत्त्वाचे असते.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन स्त्रीवादाचा अप्रत्यक्ष पण प्रभावी आधारस्तंभ आहे. त्यांनी शब्दांतून स्त्रीवाद मांडला नाही, परंतु त्यांच्या जीवनप्रवासाने स्त्रीच्या दुहेरी संघर्षाचे वास्तव जगासमोर ठेवले. जातीय अन्याय आणि पितृसत्ताक व्यवस्था या दोन्हींचा सामना करत त्यांनी आपले जीवन जगले. आजच्या स्त्री-अभ्यासात रमाबाईच्या जीवनाकडे केवळ सहनशीलतेचे प्रतीक म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत मोलाचे योगदान देणाऱ्या स्त्री म्हणून पाहिले जाणे आवश्यक आहे.

आजच्या काळात रमाबाई आंबेडकर यांचे स्मरण केवळ औपचारिक जयंतीपुरते मर्यादित राहू नये. त्यांच्या जीवनाचा अभ्यास करताना स्त्री-संघर्ष, दलित प्रश्न, कुटुंबातील त्याग, मानसिक सहनशीलता, भावनिक श्रम आणि सामाजिक परिवर्तनातील अदृश्य योगदान या सर्व पैलूंवर गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. रमाबाईच्या जीवनकथेचा समावेश शिक्षणक्रमात, सामाजिक चर्चेत, स्त्री-अभ्यासात आणि दलित साहित्याच्या अभ्यासात होणे ही काळाची गरज आहे.

रमाबाई आंबेडकर यांचे जीवन हे भारतीय समाजाच्या वास्तवाचे आरसेपण आहे. त्या समाजाच्या कडेला उभ्या राहिलेल्या, पण परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेल्या स्त्रीचे प्रतीक आहेत. त्यांनी कधीही स्वतःसाठी इतिहास लिहिला नाही, परंतु त्यांच्या त्यागाने इतिहास घडविला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यामागील अदृश्य शक्ती म्हणून रमाबाईचे स्थान अढळ आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या मूल्यांना आत्मसात करणे, हेच त्यांच्या जयंतीचे खरे औचित्य ठरेल.

रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आपण केवळ अभिवादन न करता त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन आजच्या सामाजिक प्रश्नांकडे नव्या दृष्टीने पाहिले पाहिजे.

स्त्री सक्षमीकरण, सामाजिक न्याय, मानवी मूल्यांची जोपासना, समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांच्या अंमलबजावणीसाठी रमाबाईचे जीवन मार्गदर्शक ठरते. त्यांचे मौन आजही आपल्याशी बोलते, त्यांचा त्याग आजही समाजाला प्रश्न विचारतो आणि त्यांचे जीवन आजही परिवर्तनाची प्रेरणा देते. म्हणूनच रमाबाई भिमराव आंबेडकर या केवळ इतिहासातील व्यक्तिमत्त्व नाहीत, तर त्या वर्तमान आणि भविष्याला दिशा देणाऱ्या विचारांची अखंड साक्ष आहेत.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# रमाई आंबेडकर : संघर्ष, त्याग आणि सामाजिक क्रांतीची शांत मशाल

इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे गाजतात, तर काही व्यक्तिमत्त्वे इतिहास घडवतात. काहींची नावे सुवर्णाक्षरांनी लिहिली जातात, तर काहींचे अस्तित्वच इतिहासाला दिशा देते. रमाई आंबेडकर या दुसऱ्या प्रवाहातील व्यक्तिमत्त्व होत्या. बाबासाहेब आंबेडकरांच्या तेजस्वी विचारांच्या मागे उभी असलेली ही शांत शक्ती, सामाजिक क्रांतीची न दिसणारी पण अत्यंत निर्णायक मशाल होती. रमाई म्हणजे केवळ बाबासाहेबांची पत्नी नव्हे; त्या म्हणजे दुःखाला धैर्यात रूपांतर करणारी स्त्री, अन्यायाला सहन न करता विचारात बदल घडवणारी माता आणि दलित-वंचित समाजाच्या मुक्तीसाठी स्वतःचे आयुष्य अर्पण करणारी संघर्षयोद्धा. आज रमाई आंबेडकर जयंती साजरी करताना प्रश्न उभा राहतो, आपण रमाईना किती समजून घेतले आहे? त्यांच्या जीवनातील त्याग, वेदना आणि संघर्षाला किती न्याय दिला आहे?

रमाईचे बालपण म्हणजे गरिबी, उपेक्षा आणि सामाजिक अन्याय यांचे जिवंत चित्र होते. जातीय व्यवस्थेच्या बेड्या, स्त्री म्हणून दुय्यम स्थान आणि आर्थिक अभाव, या तिहेरी संकटात रमाईचे आयुष्य घडले. परंतु या परिस्थितीने त्यांना मोडले नाही; उलट त्यांच्या मनात संघर्षाची मशाल पेटवली. बाबासाहेबांशी विवाहानंतर रमाईचे आयुष्य अधिक कठीण झाले. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे सततचा अभ्यास, आंदोलन, प्रवास आणि सामाजिक संघर्ष. त्या संघर्षाच्या प्रत्येक टप्प्यावर रमाईचा वाटा होता पण तो वाटा इतिहासाने फारसा नोंदवला नाही. रमाईचा संघर्ष हा मंचावरचा नव्हता; तो घरातला होता. बाबासाहेबांच्या आंदोलनासाठी आवश्यक असलेली आर्थिक व्यवस्था सांभाळताना रमाईनी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवल्या. घरातील दागिने विकले, उपाशी राहिल्या, अपमान सहन केला; पण बाबासाहेबांच्या विचारांवर कधीही प्रश्नचिन्ह लावले नाही. त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठी शोकांतिका म्हणजे त्यांच्या मुलांचे अकाली निधन. मातृत्वाचा आनंद मिळण्याआधीच त्यांना संततीच्या मृत्यूचे दुःख सहन करावे लागले. एका आईसाठी यापेक्षा मोठे दुःख कोणते असू शकते? पण रमाईनी बाबासाहेबांच्या कार्यात खंड पडू दिला नाही. त्यांच्या अश्रूंमध्येही सामाजिक क्रांतीचे स्वप्न जिवंत होते.

रमाईचे जीवन म्हणजे एका स्त्रीच्या वेदनांचा इतिहास नाही; तो सामाजिक अन्यायाविरुद्धचा मौन बंडखोरीचा इतिहास आहे. भारतीय समाजात स्त्रीला नेहमीच सहनशीलतेचे प्रतीक मानले गेले. पण रमाईनी सहनशीलतेला संघर्षाची दिशा दिली. त्यांनी कधीही सार्वजनिक मंचावर भाषणे दिली नाहीत; पण त्यांच्या जीवनातील प्रत्येक निर्णय हा स्त्रीस्वातंत्र्याचा घोष होता. आज स्त्री सक्षमीकरणाच्या चर्चा मोठ्या प्रमाणावर होतात पण रमाईचे जीवन सांगते की, स्त्री सक्षमीकरण म्हणजे केवळ अधिकारांची भाषा नाही; ते त्याग, आत्मसन्मान आणि संघर्ष यांचे मिश्रण आहे. रमाई म्हणजे भारतीय स्त्रीवादी चळवळीतील दुर्लक्षित अध्याय. त्यांचे योगदान नोंदवले गेले असते, तर भारतीय स्त्रीवादी विचारांना अधिक व्यापक सामाजिक अधिष्ठान मिळाले असते. दलित चळवळ म्हणजे केवळ राजकीय आंदोलन नाही; ती मानवी प्रतिष्ठेची लढाई आहे. बाबासाहेबांनी या लढाईला वैचारिक अधिष्ठान दिले; पण त्या विचारांना भावनिक आधार रमाईनी दिला. बाबासाहेबांच्या आंदोलनामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर विरोध झाला. त्या विरोधाचा सामना करताना रमाईना सामाजिक बहिष्कार, अपमान आणि उपेक्षा सहन करावी लागली. पण त्यांनी कधीही आपल्या भूमिकेत तडजोड केली नाही. दलित समाजातील महिलांसाठी रमाईचे जीवन एक दीपस्तंभ ठरले. आज दलित चळवळीत महिलांचा वाढता सहभाग हा रमाईच्या त्यागाचा परिणाम आहे, हे विसरता येणार नाही.

भारतीय इतिहास लेखनात स्त्रियांचे योगदान अनेकदा दुर्लक्षित राहिले आहे. रमाईचे जीवन हे त्याचे ज्वलंत उदाहरण आहे. बाबासाहेबांवर अनेक ग्रंथ लिहिले गेले; पण रमाईच्या योगदानावर फारसा प्रकाश टाकला गेला नाही. हा विस्मरण केवळ ऐतिहासिक नाही; तो सामाजिक मानसिकतेचा परिणाम आहे. समाजाने नेहमीच पुरुषांच्या नेतृत्वाला महत्त्व दिले; पण त्या नेतृत्वामागील स्त्रीच्या त्यागाकडे दुर्लक्ष केले. रमाईच्या जीवनाचा अभ्यास म्हणजे भारतीय समाजाच्या या मानसिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे होय. आज भारतीय समाजात जातीय विषमता, आर्थिक असमानता आणि स्त्रीविरोधी मानसिकता अजूनही अस्तित्वात आहे. संविधानाने समानता दिली असली तरी सामाजिक वास्तव अजूनही असमानतेने भरलेले आहे. अशा परिस्थितीत रमाईचे जीवन आपल्याला सांगते की, क्रांती ही केवळ घोषणांनी होत नाही; तर ती त्यागातून जन्मते. ते सांगते, संघर्ष हा केवळ रस्त्यावरचा नसतो; तो घरातही असतो. ते सांगते, स्त्री ही केवळ सहकारी नसते; ती परिवर्तनाची शक्ती असते. आजची तरुण पिढी आधुनिकतेकडे झुकत आहे, पण त्या आधुनिकतेला सामाजिक न्यायाची जोड देणे आवश्यक आहे. रमाईचे जीवन हे शिकवते की सामाजिक परिवर्तन हे दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण संघर्षातून घडते. रमाई आंबेडकर म्हणजे केवळ बाबासाहेबांच्या जीवनातील एक अध्याय नव्हे; त्या भारतीय सामाजिक क्रांतीच्या इतिहासातील एक अपरिहार्य शक्ती होत्या. त्यांच्या त्यागाशिवाय बाबासाहेबांचे कार्य इतके व्यापक झाले असते का, हा प्रश्न आजही समाजाला विचार करायला भाग पाडतो. रमाईचे जीवन म्हणजे एका स्त्रीचे दुःख नाही; ती भारतीय समाजाच्या परिवर्तनाची गाथा आहे.

आज रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त आपण केवळ हार अर्पण करून थांबू नये. तर आपण स्वतःला प्रश्न विचारला पाहिजे, ङ्गआपण बाबासाहेबांचे विचार जगतो आहोत का? आपण रमाईच्या त्यागाचा सन्मान करतो आहोत का? आपण समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचवत आहोत का?ङ्घ जर उत्तर 'नाही' असेल, तर रमाईची जयंती केवळ औपचारिक ठरेल. म्हणून आज गरज आहे, जातिव्यवस्थेविरुद्ध निर्भीड लढ्याची, स्त्रीदास्याविरुद्ध विचारांची, आर्थिक अन्यायाविरुद्ध संघटित संघर्षाची आणि बाबासाहेबांच्या विचारांना सामाजिक व्यवहारात उतरवण्याची. रमाईचा खरा सन्मान म्हणजे, दलित, वंचित आणि स्त्रियांच्या स्वाभिमानासाठी उभे राहणे. रमाईची खरी जयंती म्हणजे, समानतेचा विचार प्रत्यक्ष जीवनात उतरवणे. रमाईची खरी श्रद्धांजली म्हणजे, अन्यायाविरुद्ध मौन तोडणे. तर चला आज आपण संकल्प करू या ङ्गरमाईच्या त्यागाला शब्द नव्हे, कृती देऊ!ङ्घ; ङ्गबाबासाहेबांचे विचार केवळ पुस्तकात नव्हे, समाजात उतरवू!ङ्घ; ङ्गजात, लिंग आणि वर्गाच्या भिंती पाडून समतेचा भारत घडवू!ङ्घ कारण रमाई आंबेडकर म्हणजे केवळ इतिहास नाही तर ती, त्या वर्तमानाची जाणीव आणि भविष्यातील दिशा आहेत.

रमाई आंबेडकर यांचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग आणि सामाजिक न्यायाची अमर गाथा. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना आपण केवळ शब्दांनी श्रद्धांजली देऊ नये; तर त्यांच्या विचारांना कृतीत उतरवण्याची प्रतिज्ञा करावी. रमाईच्या त्यागातून प्रेरणा घेऊन बाबासाहेबांच्या विचारांनी समाज घडवू या, हीच त्यांच्या स्मृतींना खरी आदरांजली! समानता, स्वाभिमान आणि मानवतेच्या मूल्यांसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त सर्वांना क्रांतिकारी शुभेच्छा!

**- प्रविण बागडे**

## आनंदलहरी भाग-१४९

**विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।**

पंढरीचा पांडूरंग हा समतेचे प्रतिक आहे. त्याला उच्च-नीच, लहान-मोठा, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत असा भेद नाही. समचरणी उभा असलेला हा भगवंत सर्व भक्तमंडळीला समतेचा मंत्र देतो. कसल्याही प्रकारचा भेद न मानणाऱ्या या भगवंताचे भक्तही त्याच्या विचाराचे पालन करतात. सर्व प्राणीमात्रात या भगवंताला भक्तमंडळी पाहते. वारकरी सांप्रदाय हे महाराष्ट्राचे भूषण आहे. मानवतेचा आधारस्तंभ असणाऱ्या या सांप्रदायाने समतेचा पाया मजबूत केला आहे. वारकरी सांप्रदायामध्ये भेदाला अजिबात स्थान नाही. मानवाच्या ठिकाणी तसेच सर्व प्राणीमात्राच्या ठिकाणी समत्व जोपासण्याचे कार्य या वैष्णवांकडून होते. केवळ गळयात माळ, कपाळाला टिळा, मुखात नाम एवढेच वैष्णवांचे वैशिष्ट नसून समता, बंधूता, आपुलकी, जिव्हाळा हे या सांप्रदायाचे मुख्य वैशिष्ट्य आहे. पेहरावावरुन वैष्णव मानला जात नाही तर वर्तनावरुन वैष्णव मानला जातो. केवळ पेहराव विचारात घेऊन वैष्णव मानला तर एखादवेळी फसवणूक होऊ शकते. वैष्णवांचा पेहराव धारण करुन समाजाची व पर्यायाने स्वत:ची फसवणूक करणारे आहेत. तुकाराम महाराजांनी अशा व्यावहारिक पेहराव धारकांना खूप शब्दिक चोप दिला आहे. खरा वैष्णव तोच आहे, जो जगात समत्व, सौख्य पाहतो. भेदाला, द्वैताला तो अमंगल मानतो. हे स्पष्ट करतांना महाराज म्हणतात, 'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म' भेदाभेद भ्रम अमंगळ''



धर्म म्हणजे निती नियमांचे पालन होय. वैष्णवांनी निती-नियमांचे पालन करुन समता जोपासली पाहिजे. समाजातील अनिष्ट प्रथा, रुढी, परंपरा नष्ट केल्या पाहिजेत. त्यासाठी त्यानी स्वत: अगोदर तसे वागले पाहिजे. महाराजानी अभिमानाने व आत्मविश्वासाने वैष्णवाबद्दल आपले मत मांडले आहे. वैष्णव कसल्याही प्रकारचा भेद पाळत नाहीत. त्यांना सर्व जिवमात्र समान असतात. सर्व जगत विष्णुमय, जाणणे व मानणे, हाच वैष्णवांचा धर्म असतो. महाराजांचा वैष्णवाबद्दलचा हा आत्मविश्वास आपण सर्व भगवद्भक्तांनी टिकवून ठेवला पाहिजे. हे टिकविण्यासाठी प्रथम अंतरंगाकडे आपण पाहिले पाहिजे. आपल्याकडून चुकीचे कांही घडले किंवा कोणाची फसवणूक झाली तर हा सर्व सांप्रदाय बदनाम होऊ शकतो. हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. वारीला जाताना भिक्षा मागणे किंवा भक्तीचा व्यवहार करणे चुकीचे आहे. श्रीमंतांचे आमंत्रण स्विकारणे, गरीबांचे नाकारणे किंवा पैसेवाल्याच्या जवळ जाऊन नाटकी आशीर्वाद देणे व गरीबांकडे दुर्लक्ष करणे हे पण योग्य नाही. वैष्णवांना सर्व समानच असले पाहिजेत. प्रत्येक जीवमात्रात एक भगवंतच वास करीत असल्याने त्याच्यात लहान-मोठा असा भेद होता कामा नये. एखाद्याने व्यवस्था केली म्हणून भरपूर आशीर्वाद व एखादा व्यवस्था करण्यात कमी पडला म्हणेन रागाची भाषा वैष्णवांकडे नसावी. कोणाच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करायचे, कोणाला निवडून येण्याचा आशीर्वाद द्यायचा किंवा व्यवहारापोटी आणखी असेच काही करायचे, हा वैष्णवांच्या विषय नसावा असे वाटते. चांगल्या समाजार्मितीची व त्याला टिकवून ठेवण्याची मोठी जबाबदारी वैष्णवांवर आहे. समाजाचा वैष्णवांवर विश्वास आहे. तो विश्वास टिकवलाच पाहीजे. जय जय राम कृष्ण हरी।

**-ज्ञानदास डॉ. विजयकुमार पं. फड**

# साखर कारखान्यातील वजन काट्यांची पडताळणी पूर्ण; शंका असल्यास तक्रार करण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी)- सन २०२५-२६ चा साखर गाळप हंगाम सध्या सुरू आहे. त्या पार्श्वभुमिवर साखर कारखान्यांमध्ये वापरात असणाऱ्या सर्व वजन काट्यांची पडताळणी व मुद्रांकन निरीक्षक, वैध मापनशास्त्र विभागामार्फत करण्यात आले आहे. तसेच जिल्हास्तरावर वाहन काट्यांची तपासणी करण्यासाठी विशेष पथकांची स्थापना करण्यात आली असून या पथकांमार्फत नियमित तपासण्या सुरू आहेत,असे छत्रपती संभाजीनगर विभागाचे सह नियंत्रक वैध मापन शास्त्र सु.ह. चाटे यांनी कळिवले आहे.

शेतकऱ्यांना जर उसाच्या वजनाबाबत कोणतीही शंका किंवा तक्रार असल्यास त्यांनी आपल्या वाहनाचे वजन साखर कारखान्याबाहेरील अधिकृत वजन काट्यावर करून घ्यावे व वजनाबाबतची रितसर पावती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. बाहेरील वजन काट्यावरील वजन आणि साखर कारखाना परिसरातील वाहन काट्यावरील वजनामध्ये तफावत आढळून आल्यास संबंधितांनी तात्काळ वैध मापनशास्त्र कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी.

छत्रपती संभाजीनगर विभागातील जिल्ह्यांतील वैध मापनशास्त्र कार्यालयांशी संपर्क साधण्याचे आवाहन विभागाचे सह नियंत्रक वैध मापनशास्त्र सु. ह. चाटे यांनी केले आहे.

संपर्कासाठी क्रमांक - सह नियंत्रक वैध मापनशास्त्र सु.ह.चाटे, विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

दुरध्वनी क्रमांक ०२४० - २९५२६५६, भ्रमण ध्वनी क्रमांक ९४२०६९९०११, उप नियंत्रक वैध मापनशास्त्र शि.ये. मुंढे छत्रपती संभाजीनगर.

दुरध्वनी क्रमांक - ०२४०-२४८३८१८, भ्रमनध्वनी क्रमांक - ८२०८८६१२७०, उपनियंत्रण वैध मापनशास्त्र छत्रपती संभाजीनगर शि.ये. मुंढे दुरध्वनी क्रमांक -०२४० -२४८३८१८, भ्रमण ध्वनी क्रमांक - ८२०८८६१२७०, उप नियंत्रक वैध मापनशास्त्र बीड जिल्हा गं.मा. कांबळे दुरध्वनी क्रमांक ०२४४२ - २२२४१७, भ्रमण ध्वनी क्रमांक - ९०६७१४६८८४, उप नियंत्रक, वैध मापनशास्त्र र.धो.दराडे (अति कार्यभार) जालना जिल्हा दुरध्वनी क्रमांक - ०२४८२ -२२०७४३, भ्रमण ध्वनी क्रमांक - ९४२१४३९९९९, उप नियंत्रक वैधमापनशास्त्र गं.मा.कांबळे (अति कार्यभार) दुरध्वनी क्रमांक - ०२४५२ २२१२५८, भ्रमण ध्वनी क्रमांक - ९०६७१४६८८४,

उपनियंत्रक, वैध मापनशास्त्र नांदेड, लातूर व धाराशिव आ.आ.कुलकर्णी (अति.कार्यभार) - दुरध्वनी क्रमांक - ०२४६२-२३३८८१, भ्रमण ध्वनी क्रमांक - ९३२५७०२५६९.

# महानगरपालिका प्रियदर्शनी विद्यालय मयूरबन कॉलनी येथे डिजिटल पल्स व रीडिंग फेअरचे उत्साहात उद्घाटन



छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, प्रियदर्शनी शाळा येथे डी मार्ट फाउंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या डिजिटल लिटरसी व रीडिंग प्रोग्राम अंतर्गत डीएमएफ ॲन्युअल शोकेस (२०२५-२६) या कार्यक्रमाचे अत्यंत यशस्वी व कौतुकास्पद आयोजन करण्यात आले.

## प्रियदर्शनी शाळेत 'डीएमएफ ॲन्युअल शोकेस (२०२५-२६)' चे यशस्वी व कौतुकास्पद आयोजन

या कार्यक्रमाचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले याप्रसंगी प्रमुखा अतिथी महानगरपालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर पारस मंडलेचा, श्रीमती डॉक्टर मंडलेचा, उपायुक्त अंकुश पांढरे नगरसेविका अर्चना निळकंठ व अनिता मानकापे, विद्या प्राधिकरण च्या प्राचार्या शैलजा दराडे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण अधिकारी अश्विनी लाटकर मनपा शिक्षणाधिकारी भारत तिनगोटे, गोविंद बाराबोटे स्वप्निल सरदार, आर जे सेजल, मुंबई येथील डी मार्ट चे पुलकित कुमार मॅनेजर, सिद्धांत मालवणकर प्रोग्राम असोसिएट हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रारंभी मुख्याध्यापक संजीव सोनार यांनी प्रास्ताविक करून सर्व अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या डिजिटल व वाचन कौशल्यांचा विकास साधण्यासाठी विविध शैक्षणिक स्टॉल्स उभारण्यात आले होते.

डिजिटल लिटरसी प्रोग्राम (डीएलपी) अंतर्गत टीचर जर्नी, स्टुडन्ट जर्नी, गुगल डॉक्स, गुगल शीट्स, इंटरनेट, स्क्रॅच, पेंट यांसारख्या विषयांवर आधारित स्टॉल्स ठेवण्यात आले होते.

या स्टॉल्सच्या माध्यमातून विविध शैक्षणिक खेळ घेऊन विद्यार्थ्यांना संगणकाच्या वापराबाबत प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला.

रीडिंग प्रोग्राम रीडिंग लॅडर, बुक काउंटर, पपेट शो, इमोशन काउंटर, पोएम काउंटर इत्यादी उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांची वाचन पातळी सुधारण्यावर भर देण्यात आला. वाचनाशी संबंधित विविध खेळ व कृतींमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे, ज्ञानाचे व कौशल्यांचे अतिशय सुंदर प्रदर्शन केले.

प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या स्टॉलवर आत्मविश्वासाने माहिती देत उपक्रम सादर केले. स्टॉलला भेट देणाऱ्या अधिकारी व पालकांनी प्रश्न विचारले असता विद्यार्थ्यांनी अत्यंत समाधानकारक व आत्मविश्वासपूर्ण उत्तरे दिली.

विद्यार्थ्यांनी हा कार्यक्रम अतिशय उत्साहाने व जबाबदारीने सादर केल्यामुळे सर्वांचे विशेष लक्ष वेधले. व डी मार्ट फाउंडेशनचा संपूर्ण स्टाफ तसेच पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी डी मार्ट चे संतोष थुट्टे, बी आर राठोड, तेजस्विनी देसले रश्मी होनमुटे, प्रतिभा गावंडे, काकासाहेब जाधव, सचिन लवेरा, प्रकाश इंगळे मोनिका चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात बुधवारी (दि.११) पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी)- जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे, या मेळाव्याचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा,असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सुरेश बहुरे यांनी केले आहे.

या मेळाव्यात छत्रपती संभाजीनगर येथील टोयोटा किर्लोसकर मोटर, परकिन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कॉस्मो फिल्म्स प्रा. लि., औरंगाबाद ॲटो ॲसिलरी, संजीव ॲटो पार्टस मॅन्यूफॅक्चरिंग लिमिटेड, रूचा इंजिनियर्स प्रायव्हेट लिमिटेड, साई सुप्रिम इक्वीपमेंट, चिकलठाणा, वार्नर इलेक्ट्रॉनिक्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, शेंद्रा, क्लॅड मेटल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, एक्सल/ रूचा इंजिनियरिंग, बागला गृप, अलंकार इंजिनिअरींग ईक्युपमेंट प्रा. लि. शेंद्रा, एस एस कंट्रोल प्रा.लि., इंडूरन्स टेक्नोलॉजी लि., निपूण स्कील्स / मल्टीसर्व्हिसेस, एआरएमएस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, मेडिरिक्रूटर्स - पॅन इंडिया, लाईफ इंश्यूरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, धूत ॲटोमोटिव सिस्टीम प्रा. लि., रिझल्ट सिएक्स प्रा. लि., युनिकेअर हेल्थ केअर प्रा. लि., क्रेस क्रॉप प्रा. लि., श्री गणेश प्रेस प्रा. लि., शॉपर्स स्टॉप प्रा. लि., समर्थ इलेक्ट्रोकेअर प्रा. लि., अजिंक्य ग्रूप ऑफ बिझनेस, पंचशिल बिल्डकॉइन, कल्याण ज्वेलर्स इंडिया लिमिटेड, हम्मा फूड्स प्रायव्हेट लिमिटेड, पिएमएम परिहारमिलन इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, कैझन प्लास्टोमोल्ड प्रायव्हेट लिमिटेड, इंस्टर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, डॉ. रेड्डी फाउंडेशन, व्हीज्युअल इंन्फोसिस्टीम प्रा.लि., एक्सीडी इंडिया प्रा. लि., बुश इलेक्ट्रोमेक ॲड इंजिनिअरींग प्रा.लि., नाथ फॉईल्स प्रा.लि., नेटलॅप ईट ट्रेनींग ॲड सोलूशन अशा नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. या विविध ३७ आस्थापनांकडून २५३३ रिक्तपदे प्राप्त झालेली असून ते प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखत घेणार आहे. त्यासाठी कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक युवक युवतींसाठी शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या मेळाव्यात सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदांसाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. बुधवार दि.११ रोजी सकाळी साडेनऊ वा. कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्त्यांकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# महाशिवरात्र यात्रा; वाहतुक मार्गात बदल

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी) - वेरुळ येथील ज्योतिर्लिंग घ्रुष्णेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त मोठी यात्रा असते. भाविकांची गर्दी असते. त्यामुळे महाशिवरात्री कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून दि.१४ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत धुळे सोलापूर महामार्गावरील वाहतुक मार्गात बदल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी आदेश निर्गमित केले आहेत. करण्यात आलेले बदल याप्रमाणे- १. कन्नड, वेरुळ, खुलताबाद, दौलताबाद मार्गे छत्रपती संभाजीनगर जाणारी वाहने कन्नड,वेरुळ, कसाबखेड फाटा,वरझडी, माळीवाडा, शरनापूर फाटा मार्गे छत्रपती संभाजीनगरकडे जातील.

२. छत्रपती संभाजीनगर, दौलताबाद, खुलताबाद, वेरुळ मार्गे कन्नडकडे जाणारी वाहने छत्रपती संभाजीनगर, शरनापूर फाटा, माळीवाडा, वरझडी, कसाबखेडा फाटा, वेरुळ मार्गे कन्नडकडे जातील.

३. फुलंब्री , सुलतानपुर, खुलताबाद, वेरुळ मार्गे कन्नडकडे जाणारी वाहने फुलंब्री, छत्रपती संभाजीनगर, शरनापुर फाटा, माळीवाडा, वरझडी, कसाबखेडा फाटा, वेरुळ मार्गे कन्नडकडे जातील.

# कर्जत येथील अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या मेळाव्यानिमित्त पिंपरी येथे आढावा बैठक

पिंपरी, दि. ६ (प्रतिनिधी) -रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राज्यस्तरीय जिल्हा व तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळ्याचा कार्यक्रम २२ फेब्रुवारी रोजी आयोजित केला आहे. त्यानिमित्त आज पिंपरी येथे परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख आणि मुख्य विश्वस्त शरद पाबळे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पिंपरी चिंचवड पत्रकार संघाची नियोजन व आढावा बैठक झाली.

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या पत्रमहर्षी रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा पत्रकार संघ आणि वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण आणि राज्यातील तालुका अध्यक्षांचा मेळावा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथे होत आहे. येत्या २२ फेब्रुवारी २०२६ रोजी, रविवारी कर्जत येथील रॉयल गार्डनमध्ये सकाळी ११ वाजता हा सोहळा होत आहे. ग्रामीण महाराष्ट्रात अनेक तालुका पत्रकार संघ उत्कृष्ट पत्रकारितेबरोबरच समाजासाठी देखील अनेक उपक्रम राबवत असतात. त्यांच्या या कार्याचा राज्य पातळीवर सन्मान व्हावा, त्यांचं कौतूक व्हावं यासाठी प्रत्येक महसूल विभागातून एका तालुका पत्रकार संघाची आदर्श पत्रकार संघ पुरस्कारासाठी निवड केली जाते या कार्यक्रमाला अधिकाधिक पत्रकारांनी सहभागी व्हावे या संदर्भात आजच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. कार्यक्रम नियोजनबद्ध कसा करता येईल त्यासाठी नियोजन करण्यात आले. पिंपरी येथील दैनिक राज्य लोकतंत्र कार्यालयामध्ये झालेल्या बैठकीला मार्गदर्शक व अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त शरद पाबळे, राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशी, जिल्हा संघटक चिराग फुलसुंदर, पिंपरी चिंचवड पत्रकार संघ अध्यक्ष अनिल वडघुले, डिजिटल मिडिया परिषद पिंपरी चिंचवड शहर अध्यक्ष विनय सोनवणे, सचिव सागर सूर्यवंशी , आदी मान्यवर उपस्थित होते.

# संभाजीनगरच्या अनुपमाची लॉन टेनिस स्पर्धेत दमदार कामगिरी



छत्रपती संभाजीनगर,दि. ६ (प्रतिनिधी) - गोवा येथे २२ जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान गोवा स्टेट लॉन टेनिस असोसिएशन, दि गॅस्पर डाय व गद्रे ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गद्रे गॅस्पर डाईस ऑल इंडिया ओपन लॉन टेनिस स्पर्धा २०२६'मध्ये शहराच्या अनुपमा दराडे हिने उल्लेखनीय कामगिरी करत महिला दुहेरी व मिश्र दुहेरी गटात दोन सन्मान पदके पटकावली.

महिला दुहेरी गटाच्या उपांत्य फेरीत अनुपमाने गोव्याच्या जोडीवर ६-३, ६-० असा दणदणीत विजय मिळवत अंतिम फेरी गाठली. तर मिश्र दुहेरी गटात बेंगळुरूच्या जोडीला ६-४, ४-६, १०-८ असे नमवून अंतिम फेरीत प्रवेश केला. दोन्ही गटांतील अंतिम सामने रोमहर्षक ठरले.पारितोषिक वितरण सोहळ्यात संघटनेचे अध्यक्ष समीर काकोडकर व माजी अध्यक्ष राजेंद्र गुडीन्हो यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. एम आयटी लॉन टेनिस अकॅडमीची खेळाडू असलेल्या अनुपमाला प्रशिक्षक किशोर घाडगे व स्पोर्ट्स डायरेक्टर प्रसाद कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. पालकमंत्री संजय शिरसाठ यांनीही सत्कार करून तिच्या यशाचे विशेष कौतुक केले.

# श्री. गजानन महाराजांचे चरित्र नियमित पारायण करणारा एक दिवस निश्चितच 'नारायण' बनतो -हभप जय महाराज सरनाईक -वाशिमकर



वैजापूर, दि. ६ (प्रतिनिधी) - शेगावीचे संत श्रेष्ठ श्री समर्थ गजानन महाराज यांचे चरित्र साक्षात 'परीस'आहे,या चरित्राचे जो भक्त नियमित पारायण करतो तो भक्त एक दिवस निश्चितच 'नारायण'बनतो असे अमृत वचन महाराष्ट्रातिल पहिले श्री संत गजानन महाराज भाव कथाकार झी टॉकीज फेम हभप जय महाराज सरनाईक (वाशिमकर)यांनी वैजापूर येथील गुरुवार(ता.०५)रोजी आरंभ झालेल्या संत गजानन महाराज चरित्र भावकथेत केले.ते पुढे म्हणाले की,श्री गजानन महाराजांचे अवतार कार्य म्हणजे त्यांनी समाजाला दिलेले 'बोधामृत' होय.

श्री गजानन महाराज प्रकट दिन निमित्त येथील श्री सुंदर गणपती मंदिर मित्र मंडळ व श्री गजानन महाराज भक्त परिवार यांच्या वतीने या १२व्या वर्षीही त्रिदिवशीय चरित्र पारायण ठेवण्यात आले असून त्या अनुषंगाने चरित्र भाव कथा आयोजित करण्यात आल्या आहेत. संस्थापक अध्यक्ष काशिनाथ आगाज व मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.या चरित्र भावकथा कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्र संचलन जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व जेष्ठ लेखक धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. अत्यंत भावपुर्ण कार्यक्रमात महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित आहे. जवळपास सव्वातीनशे परायनार्थी पारायण करीत आहेत. उत्सव समितीचे अजय भुजबळ, संतोष बोथरा, श्रावण चौधरी, राजू पुणे, श्याम पवार, गोटीराम बिडवे, दीपक आहेर, महेश डांगरे, कुणालजगताप, श्याम आगाज, गणेश धुमाळ, अमोल निखाडे, सिद्धेश्वर धुमाळ, सचिन दाढे सहभाग नोंदवीत आहेत. विनोदशेठ राजपूत, डॉ.बी.बी.शिंदे, उमेश पगारे, पुंडलिक गायकवाड, प्रेम राजपूत, वैभव खरोटे, विलास रामैय्या, अरुण आंबेकर, गिरीश चापानेरकर, शैलेश पोंदे, जितेंद्र पवार, संजय पुणे, रवींद्र गुळसकर, नगरसेविका जयश्री श्रावण चौधरी, कल्याणी सोंनदे, शीतल रोजेकर, वैशाली पवार, सोनी अपशिंदे, संगीता लाडवाणी, महेश धुमाळ, आनंद बसवेकर, नीता सुरेश वडणेरे, सचिन जोशी सहकार्य करीत आहेत. सूत्रसंचलन धोंडीराम सिंह राजपुत करीत आहेत.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रिकेट संघटनेत बेकायदेशीर कारभाराचा आरोप; धर्मादाय आयुक्तांकडे चौकशी व प्रशासक नेमण्याची मागणी

## महाराष्ट्र क्रिकेट संघटनेतील वादाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा संघटनेतील २० वर्षांपासून सुरू असलेली कथित बेकायदेशीर 'मोडस ऑपरेंडी' पुन्हा चर्चेत



किरण जोशी, करण डोग्रा, मोहन बोंबले यांची पत्रकार परिषदेत माहिती

छत्रपती संभाजीनगर, दि. ६ (प्रतिनिधी)- छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) जिल्हा क्रिकेट संघटनेतील बेकायदेशीर कारभार, विश्वस्त नोंदणीतील अनियमितता आणि सभासद नोंदणीतील गैरप्रकार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आले आहेत. महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यभरात सुरू असलेल्या वादाच्या निमित्ताने या प्रकाराची गंभीर दखल धर्मादाय आयुक्त, उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने घेतली असून ही बाब स्वागतार्ह असल्याचे मत नोंदणीकृत विश्वस्तांनी व्यक्त केले आहे.

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने केलेल्या कथित बेकायदेशीर कृत्यांची 'शिकवणी' जणू काही छत्रपती संभाजीनगर जिल्हा क्रिकेट संघटनेकडूनच घेतली असल्याचे चित्र आहे, असा गंभीर आरोप यावेळी करण्यात आला. सुमारे २० वर्षांपूर्वी याच पद्धतीने जिल्हा क्रिकेट संघटनेत गैरप्रकार करण्यात आले होते. त्या वेळी काही नोंदणीकृत विश्वस्तांनी यास विरोध केला होता. धर्मादाय आयुक्तांनी त्यांची बाजू ग्राह्य धरत सदस्य नोंदणी कायदेशीर ठरवली होती तसेच काही आजीव सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले होते.

विशेष म्हणजे, त्या वेळी बेदखल करण्यात आलेल्या विश्वस्तांबाबत भविष्यात कोणत्याही सार्वजनिक संस्थेत त्यांची नियुक्ती करताना काळजी घ्यावी, अशी टिप्पणी धर्मादाय आयुक्तांनी केली होती. यापैकी किमान एका विश्वस्ताला इतर संस्थेतूनही याच पद्धतीने बेदखल करण्यात आले होते, हे उल्लेखनीय आहे.

सध्या धर्मादाय आयुक्त व तथाकथित डि-फॅक्टो बॉडी संदर्भात तांत्रिक मुद्द्यावर उच्च न्यायालयातून स्थगिती (स्टे) मिळवून विद्यमान विश्वस्त बळजबरीने क्रिकेट संघटना चालवत असल्याचा आरोप आहे. प्रत्यक्षात विद्यमान विश्वस्तांना संघटना चालविण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. कार्यकारिणीची मुदत केवळ एक वर्षाची असताना निवडणुका न घेता आजतागायत पदाधिकारी कायम ठेवण्यात आले असून त्यांची कोणतीही वैध नोंद धर्मादाय आयुक्त कार्यालयात नाही.

नोंदणीसाठी हेच बेकायदेशीर विश्वस्त धर्मादाय आयुक्तांकडे गेले असता, नोंदणीकृत विश्वस्तांच्या आक्षेपामुळे ही नोंदणी होऊ शकली नाही. सध्या धर्मादाय आयुक्तांकडे नोंद असलेली विश्वस्त समिती ही आमच्या नावाचीच अस्तित्वात असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर नोंदणीकृत विश्वस्तांनी धर्मादाय आयुक्त तसेच जिल्हा क्रिकेट संघटनेच्या आजीव सदस्यांकडे मागणी केली आहे की, धर्मादाय आयुक्तांकडे नोंद असलेल्या आजीव सदस्यांतून नवीन कार्यकारिणीची निवड करावी किंवा प्रशासक नेमण्यात यावा. तसेच विद्यमान बेकायदेशीर विश्वस्तांच्या कारभाराची व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करावी.

याशिवाय जिल्हा क्रिकेट संघटनेचे मैदान हे धर्मादाय आयुक्तांकडे नोंद असलेल्या वैध विश्वस्तांच्या ताब्यात देण्यात यावे किंवा थेट क्रिकेट खेळाडूंच्या ताब्यात देण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

शहरातील नामांकित खेळाडू किंवा शेड्युल-१ मध्ये समाविष्ट क्रिकेट संघटनेकडे तात्पुरता ताबा देण्याची शिफारस करण्यात आली आहे. दरम्यान, निवडणुका घेण्यासाठी पूर्वी प्रयत्न करण्यात आले होते; मात्र बेकायदेशीर विश्वस्तांनी त्यावर स्थगिती मिळवली होती, असेही स्पष्ट करण्यात आले.

नोंदणीकृत विश्वस्तांनी धर्मादाय आयुक्तांना विनंती केली आहे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या नियमांनुसार संभाजीनगर जिल्हा क्रिकेट संघटनेचा ताबा नोंदणीकृत विश्वस्तांकडे देण्यात यावा. निवडणुका होईपर्यंत संघटना कोणाच्याही वैयक्तिक ताब्यात देऊ नये आणि क्रिकेट खेळ सुरळीत सुरू राहण्यासाठी तातडीचे आदेश द्यावेत.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# छत्रपती संभाजीनगरच्या महापौरपदी भाजपचे समीर राजूरकर

## उपमहापौरपदी शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ, अतुल सावेंनी केली घोषणा

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- संभाजीनगर महानगरपालिकेत भाजप-शिवसेना युतीचे सत्तावाटप निश्चित झाले असून, भाजपकडून समीर राजूरकर हे महापौरपदी विराजमान होणार आहेत. दरम्यान, शिवसेनेकडून राजेंद्र जंजाळ यांना पुन्हा एकदा उपमहापौरपदाची संधी देण्यात आली आहे.

अतुल सावे म्हणाले की, राज्यात आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामधील सरकार आहे. याच गोष्टीचा विचार करत मुख्यमंत्री फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वामध्ये शहराचा विकास करावा यादृष्टीने आम्ही भाजप-शिवसेना एकत्र काम करत आहे. संभाजीनगरच्या विकासासाठी आम्ही काम करत आहोत. दोन्ही पक्ष शहराच्या विकासासाठी कटीबद्ध आहोत. भाजपतर्फे महापौरपदासाठी समीर राजूरकर यांना संधी देण्यात आली आहे. त्यांना मनपामध्ये काम करण्याचा अनुभव आहे ते चांगले काम करू शकतील. तर उपमहापौर म्हणून शिवसेनेचे राजेंद्र जंजाळ यांना संधी देण्यात आली आहे. शिवसेना आमच्यासोबत केंद्रात आणि राज्यात सोबत सरकारमध्ये आहे. शिवसेना आमचा मित्रपक्ष आहे.

भाजपचे शहराध्यक्ष किशोर शितोळे म्हणाले की, तिकीट वाटपापासूल मी सांगत होतो की आम्ही मैत्री पूर्ण लढत आहोत. हिंदुत्वाच्या भूमिकेवर आम्ही एकत्र आलो आहोत. राज्यात अन् शहरात एकत्र काम केले पाहिजे, ही आमची भूमिका आहे. यात भाजपचा महापौर आणि शिवसेनेचा उहापौर होणार आहे. युती करणारच होतो. कारण विकासाची कामे करत असताना दोघांनी सोबत कामे केली तर शहर विकसित करू शकू. पाण्याच्या प्रश्नासाठी आम्ही काम करू आणि शहर चांगले करण्याासाठी आम्ही काम करत राहू.

शिवसेनेचे विलास पारकर म्हणाले की, महायुतीमध्ये भाजप आमचा मोठा भाऊ आहे तर शिवसेना छोटा भाऊ आहे हे आम्ही मान्य केले आहे. हिंदुत्व आणि विकासाचे राजकारण करण्याची आमची भूमिका आहे. मनपाचे निवडणूक ही कार्यकर्त्यांची होती. महायुतीमध्ये काही वाद नाही. मनपावर कायम भगवा राहणार.

महानगरपालिकेच्या निवडणुकीत ५७ जागांसह स्पष्ट बहुमत मिळवल्यानंतर भारतीय जनता पक्षाने सत्तावाटपाची प्रक्रिया वेगाने सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर पक्षाने ओबीसी प्रवर्गातील निष्ठावंत कार्यकर्ते प्रा. गोविंद केंद्रे यांची गटनेतेपदी नियुक्ती केली आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात मंत्री, खासदार आणि आमदार हे दिग्गज नेते आहेत. त्याशिवाय जालना लोकसभा मतदारसंघातील काही भागही शहरात आहे. तेथील आजी-माजी लोकप्रतिनिधींचा मनपामध्ये प्रभाव आहे. या नेत्यांचे समर्थक महापालिका निवडणुकीत विजयी झाले आहेत. आपापल्या समर्थकाची वर्णी महापौरपदी लागावी यासाठी नेते प्रयत्न करत केले. यानंतर समीर राजूरकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आला आहे.



दरम्यान दोन दिवसांपूर्वी एमआयएमचे प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांनी आम्ही भाजपाला धक्का देऊ असे विधान केले होते. भाजपाला सत्तेपासून रोखण्यासाठी आम्ही कोणालही सोबत घेऊ शकतो असे सांगत इम्तियाज जरी यांनी काही काळ हवा निर्माण केली होती. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी मात्र लोकशाहीत जनतेच्या मतांचा आदर केला पाहिजे, भाजपकडे जवळपास स्पष्ट बहुमत आहे, त्यामुळे एमआयएमचा महापौर किंवा इतर कुठलाही प्रयोग शक्य नसल्याचे सांगत इम्तियाज जलील यांचा दावा फेटाळला होता. त्यामुळे एमआयएमचा धक्का देण्याचा दावा फुसका बार ठरला आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये उद्धवसेनेच्या गटनेतेपदी नगरसेवक गणेश लोखंडे तर भाजपच्या गटनेते पदी गोविंद केंद्रे यांची निवड

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- महापालिका निवडणुकीत विजयी झालेल्या उद्धवसेनेच्या सहा नगरसेवकांनी आज त्यांच्या गटनेतेपदी नगरसेवक गणेश लोखंडे यांची तर भाजपच्या गटनेते पदी गोविंद केंद्रे यांची निवड करण्यात आली आहे.




महापालिका निवडणुकीनंतर ३० दिवसांच्या आत प्रत्येक पक्षांना त्यांच्या निवडून आलेल्या नगरसेवकांपैकी एका नगरसेवकांची गटनेतेपदी निवड करावी लागते. ही निवड केल्याची कागदपत्रे विभागीय महसूल आयुक्त यांच्याकडे सादर करणे बंधनकारक आहे. यानुसार शुक्रवारी उद्धवसेनेचे नेते अंबादास दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक गणेश कौतिकराव लोखंडे यांची उद्धवसेनेच्या गटनेतेपदी निवड करण्यात आली. यावेळी शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, हरिभाऊ हिवाळे, दिग्विजय शेरखाने, ज्ञानेश्वर डांगे, नगरसेवक रशीद मामू, सावित्रीबाई वाणी, सचिन खैरे, सुनिता सोनवणे, वैशाली कोरडे, हनुमान शिंदे व रामेश्वर कोरडे आदी उपस्थित होते.

महापालिकेत ५७ सदस्य निवडून आलेल्या भाजपच्या नगरसेवकांनी बैठक घेत आपल्या गटनेते पदाची निवड केली. गोविंद परशुराम केंद्रे यांची यावेळी एकमताने निवड करण्यात आली असून त्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे.

## जैनम महिला मंचचा हळदी कुंकवाचा कार्यकम उत्साहात पार पडला

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जैनमच्या हळदी कुंकु जल्लोषात उत्साहात पार पडले. ५०० सदस्यांची उपस्थिती होती. क्वीन ची स्पर्धा घेण्यात आली. त्याच क्वीन चा सन्मान सौ.सपना चोपडा यांनी पटकावला. तिने तीन राउड पार केला. २. स्नेहलता ठोलिया, ३. वंदना कांकरिया, ४. भावना चोरडीया यांनी मान मिळविला. २७ स्पर्धकांनी यात भाग घेतला होता. विविध गेम घेण्यात आले. महिलांनी डान्स, गाणी, जोक आदी मध्ये रमुन हळदी कुकु कार्यकमाचा आनंद घेतला तसेच भोजनाचा ही आनंद घेतला.



हा कार्यकम यशस्वी करण्यासाठी प्रायोजक इंदुमती निर्मलचंद पगारीया व आशा कासलीवाल कन्नडवाले यांनी स्विकारले. दिया काला ,सविता लोढा यांनी सुत्रसंचालन केले. संगीता संचेती यांनी वर्षभर कार्यकमाचा आढवा दिला. यावेळी परीक्षक म्हणुन रिया फिरोदीया, रविना सुगंधी हया होत्या.

कार्यकम यशस्वी करण्यासाठी मिनल बागरेचा, प्रिया बागरेचा, शितल पारख, अक्षता साकला, रेश्मा कोठारी, राखी कोठारी, सोनल कासलीवाल, विशाखा कासलीवाल, सोनल कोठारी, प्रिती पारख आदींनी परिश्रम घेतले. तसेच भारती बागरेचा, ललिता साकला यांच्यासह सर्व कार्यकारणी सदस्यांची उपस्थिती होती. कार्यकमात लासुर, कन्नड, वाळुज, पंढरपुर कचनेर आदी ठिकाणाहुन सदस्यांची उपस्थिती होती.

## महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे प्रशिक्षण आरोग्यपुरक उत्पादनांवर भर द्या-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर दि.६ (प्रतिनिधी)- महिला बचत गटांनी आपली खाद्यपदार्थांचे वा कृषी उत्पन्न आधारीत उत्पादने तयार करतांना आरोग्यपुरक उत्पादनांवर भर द्यावा,असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.






महिला आर्थिक विकास महामंडळातर्फे आज समुह साधन व्यक्तिंकरीता दोन दिवसीय हवामान बदल अनुकूलन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. माविमचे जिल्हा समन्वयक चंदनसिंग राठोड, माविमचे विभागीय सल्लागार संदीप मराठे, उत्कर्ष भोळे, सुनिल पैठणे, फारह हुसेनी आदी उपस्थित होते.

समतामूलक परिवर्तन यंत्रणा उभारण्याच्या उपक्रमाचा भाग म्हणून या हवामान बदल अनुकूलन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.दोन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमात ५२ प्रशिक्षणार्थी महिलांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. हवामान बदलांचा परिणाम ध्यानात घेऊन तयार करावयाची उत्पादने याबाबत हे प्रशिक्षण देण्यात येत आहे. खाद्यपदार्थी निर्मितीमध्ये उत्पादन ते विक्री अशी सक्षम साखळी निर्माण करण्यासाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, बचत गटाद्वारे उत्पादीत उत्पादनांना बाजारात चांगली मागणी असते. ही उत्पादने आरोग्यपूरक असावीत. पोषणमूल्य म्हणून बाजारात विक्री होणारी पेये, पदार्थ इत्यादींच्या उत्पादनात महिला बचत गटांनी योगदान द्यावे. त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी बाजारात साखळी निर्माण करता येईल,असेही त्यांनी सांगितले. या उत्पादनांची विक्री, त्यासाठी करावे लागणारे ब्रॅंडींग, त्याचे लेखे तयार करणे इ.साठीही महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे,असे निर्देशही त्यांनी दिले.

## स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यासक्रमाची पुनर्रचना आवश्यक-डॉ.प्रतिमा परदेशी

गंगापूर दि.६ (प्रतिनिधी)- एकोणिसाव्या शतकात प्रबोधनामुळे स्त्रियांचे प्रश्न चार भिंतींच्या बाहेर सार्वजनिक जीवनात आले, परंतु अलीकडे हा विचार मागे पडताना दिसत असून शेतकरी आंदोलन आणि स्त्रीमुक्ती चळवळी यांच्यात परस्पर संबंध असून स्त्रीवादी चळवळीची परंपरागत चौकट बाजूला सारून भारतीय दृष्टिकोनातून पुनर्मांडणी व्हायला हवी, असे मत डॉ. प्रतिमा परदेशी यांनी येथे बोलताना व्यक्त केले.

मुक्तानंद महाविद्यालय, गंगापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व प्रतिष्ठान महाविद्यालय, पैठण यांच्या संयुक्त विद्यमाने विषय : आधुनिक भारतातील स्त्रीवादी चळवळी (विचारप्रवाह, आव्हाने आणि रुपांतरे) या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन डॉ. पंकजा वाघमारे, सहसंचालक उच्च शिक्षण, छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते झाले. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. रामराव चव्हाण यांची उपस्थिती होती. या परिषदेत बीजभाषण म्हणून पुणे येथील प्रसिध्द विचारवंत डॉ. प्रतिमा परदेशी यांची उपस्थिती होती. त्यावेळी त्या बोलत होत्या.

(पान १ वरुन)

### दिल्लीतील रस्त्यावरील खड्ड्यात...

सुट्टी झाल्यानंतर घरी निघाला होता. पण, रस्त्यात खोदून ठेवलेला खड्डा त्याला दिसला नाही आणि तो त्यात पडला. सकाळी त्याचा मृतदेहच पोलिसांना मिळाला.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या घटनेवर सरकारवर निशाणा साधला. फोटो पोस्ट करत राहुल गांधी म्हणाले, 'भारतात पसरलेली लालच आणि बेजबाबदारीच्या रोगाने पुन्हा एकदा एका तरुणाचा जीव घेतला. एक मुलगा, एक स्वप्न, आईवडिलांचे सगळे जग, सर्व काही एका क्षणात उद्ध्वस्त झाले.'

### पाकिस्तानात शिया मशिदीत नमाज...

एकत्र आले पाहिजे आणि कायदा अंमलबजावणी संस्थांसोबत खंबीरपणे उभे राहिले पाहिजे. एचटीएन वर्ल्ड या वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, मशिदीच्या गेटवर एका व्यक्तीने स्वतःला उडवून दिले. इस्लामाबाद पोलिस आणि बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आहेत आणि जखमींना वाचवत आहेत. जखमींना पाकिस्तान इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (पीआयएमएस) आणि सीडीए रुग्णालयात नेण्यात आले आहे.

### काश्मीर पाकिस्तानचा भाग होईल,...

मोहम्मद अली जिना यांच्या नावाचा उल्लेख करताना काश्मीर पाकिस्तानची रक्तवाहिनी असल्याचे नमूद केले. काश्मीरमध्ये आम्हाला शांतता हवी आहे. पण, ही शांतता समानता आणि न्याय या तत्वावर व्हावी, असे विधान त्यांनी सभेत केले.

पाकिस्तान काश्मीरवर करत असलेल्या दावा भारताने नेहमीच फेटाळून लावला आहे. जम्मू काश्मीर आणि लडाख हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहिल अशी भूमिका मांडली आहे. इस्लामाबाद नेहमीच नेहमी दहशतवादाला खतपाणी घालत असल्याचा आरोप भारताने केला आहे.

### केंद्र सरकारविरुद्ध कुणाल कामरा...

असल्याचा दावा केला आहे.

सहयोग पोर्टल वापरकर्त्याला पूर्वसूचना न देता ऑनलाइन सामग्री हटवण्याची परवानगी देते. परिणामी, नैसर्गिक न्याय तत्त्व आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या हमीचे उल्लंघन होत आहे. याशिवाय, नियम ३ (१) (डी) आणि सहयोग पोर्टल पूर्णपणे बेकायदेशीर आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या अधिकार क्षेत्राबाहेरचे आहेत. तसेच ते २०१५ सालच्या श्रेया सिंघल विरुद्ध भारत सरकार या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरुद्ध आहे, असा दावाही कामरा याने याचिकेत केला आहे.

माहिती तंत्रज्ञान कायद्याचे कलम ७९ हे सूट देण्याशी संबंधित आहे. परंतु, नियम ३ (१) (डी) आणि सहयोग पोर्टल दोन्ही माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ७९ (३)(बी)चा आधार घेऊ शकत नाहीत. याउलट, नियम ३ (१) (डी) आणि सहयोग पोर्टल माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६९ ए आणि ब्लॉकिंग नियमांच्या समांतर अशी सामग्री हटवण्याची व्यवस्था तयार करत असून त्यात कायदेशीररित्या अनिवार्य सुरक्षा उपाय नाहीत. त्यामुळेच ही तरतूद स्पष्टपणे मनमानी आहे, असा दावा देखील कामरा याने याचिकेत केला आहे.

### अजित पवारांच्या मृत्यूचे...

दिसत होते. या पार्श्वभूमीवर विविध तर्कवितर्क मांडले जाऊ लागले. तपासासाठी केंद्रीय पथक आणि संबंधित यंत्रणा घटनास्थळी पोहोचल्या असून, अपघाताचे कारण शोधण्यासाठी सखोल चौकशी सुरू आहे.

दरम्यान, या घटनेनंतर काही तासांतच सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. या शपथविधीवरूनही चर्चा रंगल्या. मात्र, फडणवीसांनी स्पष्ट केले की, या सर्व घडामोडींमध्ये अनावश्यक राजकीय अर्थ लावणे योग्य नाही. दु:खद प्रसंगात संयम राखणे आणि कुटुंबीयांच्या भावनांचा आदर करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले.

### राज्यातील ८ शहरांना मिळाले नवे...

मिळवले आहे. येथे भाजपने महापौरपदासाठी कविता मुळे यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले आहे. येथे उपमहापौरपदासाठी दीपकसिंह रावत यांचे नाव निश्चित करण्यात आले आहे.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या महापौरपदासाठी समीर राजूरकर व उपमहापौरपदासाठी राजेंद्र जंजाळ यांचे नाव निश्चित झाले आहे. येथे राजेंद्र जंजाळ यांच्या नावाला विरोध होण्याची शक्यता आहे. यामुळे उपमहापौरपदाविषयी सध्या मोठी संभ्रमावस्थ आहे. पण सूत्रांच्या मते, त्यांच्या नावाच्या घोषणेची केवळ औपचारिकता शिल्लक राहिली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेतही भाजपच्या शर्मिला बाबर यांचे नाव महापौरपदासाठी निश्चित झाल्याची माहिती आहे. येथेही महापौर निवडीची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

### लाडक्या बहिणींना ई-केवायसी...

चुकीचा पर्याय निवडला गेल्या असल्याचे निदर्शनास आले आहे.

योजनेतील निकषाच्या अनुषंगाने सदर लाभार्थी महिलांची सखोल तपासणी करुन लाभार्थ्यांच्या पात्रता/अपात्रतेची प्रत्यक्ष पडताळणी करण्याबाबत सर्व संबंधित जिल्हाधिकारी यांना शासनानं २० जानेवारी रोजी कळवलं होतं.

या लाभार्थ्यांची जलदगतीने पडताळणी करण्याकरिता ऑनलाईन - मध्ये पुन्हा एकदा सुधारणा करण्याची संधी देण्यात यावी, अशी मागणी योजनेच्या लाभार्थ्यांकडून व क्षेत्रिय कार्यालयाकडून होत होती. यामुळं ई केवायसी प्रक्रिया करताना चुकीचा पर्याय निवडणाऱ्या महिलांना सुधारणा करण्याची एक संधी देण्यात आली आहे. ही सुधारणा ३१ मार्च २०२६ पर्यंत करता येणार आहे.

## परसोडासह भिवगांव परीसरात रानडुक्करांचा उपद्रव; वनविभागाचे दूर्लक्ष

वैजापूर दि.६ (प्रतिनिधी)- वैजापूर तालुक्यातील परसोडासह अनेक गावात मागील दोन वर्षांपासून वन्यप्राणी शेतीमालाची नासाडी करत आहे. यामुळे शेतीव्यवासाय आर्थिक कोंडीत सापडला आहे. दिवाळीनंतर अनेक शेतकऱ्यांनी गहू, हरभरा, मका, कांदा, ज्वारी या पिकांची पेरणी झाली, परंतु हरणाचे कळपासह रानडुक्कर हे पिके फस्त करीत आहेत. ही समस्या दरवर्षी येत असुन याकडे लोकप्रतिनीधीसह वनविभागाचे दूर्लक्ष असल्याचा अरोप परीसरातील शेतकरी करीत आहेत.

परसोडा, मिरकनगर, भिवगांव, औरंगपूर, संजरपुरवाडी, बेंदवाडी, शिवराई येथील शेतकऱ्यांनी अनेक वेळा महसूल विभाग व वनपरिक्षेत्र विभागात लेखी तक्रार करूही संबधित अधिकारी दखल घेत नसल्याचा आरोप शेतकरी करीत आहे. सध्या परीसरात २० ते २५ रानडुक्करांच्या कळपाने उच्छाद मांडला आहे. यासोबत पिकांची हरीणाकडुन नासाडी होत आहे. या परीसरात १५० ते २००च्या आसपास हरीण आहेत. या कळपाने धुडगुस घातला असुन पिकांची नासधूस करीत असल्याने शेतकरी अर्थिक अडचणीत सापडले आहेत. दिवसभर हरीणाचा त्रास तर रात्रभर जागुन डुक्कर पिके खात असल्याने शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. याप्रश्नी शासनाने लक्ष घालुन न्याय द्यावा अशी मागणी परीसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME
Old Name - 1. ABDUS SALAM KHAN
2. ABDUS SALAM
New Name - ABDUL SALAM KHAN
Address - H NO 1-23-53 SHAHA SIRAJ ROAD ROHILA GALLI AURANGABAD- 431- 001

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME
Old Name - 1. GULNAZ BEGUM TAVQEER AHMED KHAN
2. GULNAZ BI
New Name - GULNAZ BEGUM KHAN TAVQEER AHMED
Address - H NO 1-23-53 SHAHA SIRAJ ROAD ROHILA GALLI AURANGABAD- 431- 001

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME
Old Name - 1. KHAN TAVQEER AHMED
2. KHAN TAVQEER AHMED ABDUS SALAM
New Name - KHAN TAVQEER AHMED ABDUL SALAM KHAN
Address - H NO 1-23-53 SHAHA SIRAJ ROAD ROHILA GALLI AURANGABAD 431- 001

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME
Old Name - SAMEENA KHAN
New Name - SAMEENA BEGUM ABDUL SALAM KHAN
Address - H NO 1-23-53 SHAHA SIRAJ ROAD ROHILA GALLI AURANGABAD-431- 001